दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४१९ वा ● बुधवार, ता. १ ऑक्टोबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## तब्बल १४ मिलियन टन लिथिअम साठा भारताच्या हाती

### चीनवरील अवलंबित्व संपणार



**नागौर । रयत समाचार**

राजस्थानातील नागौर जिल्ह्यातील डेगाना तालुक्यातील रेवंत पहाडी परिसरात लिथियमचा प्रचंड साठा सापडला आहे. तब्बल १४ मिलियन टन लिथियम येथे आढळल्याचे भूगर्भशास्त्र विभागाने जाहीर केले असून, त्यामुळे भारताच्या औद्योगिक आणि तांत्रिक क्षेत्रात मोठी क्रांती घडणार असल्याचे संकेत मिळत आहेत. मोबाइल, लॅपटॉप, इलेक्ट्रिक वाहने तसेच विविध रिचार्जेबल बॅटरी निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या या दुर्मिळ खनिजामुळे आतापर्यंत भारताची चीनवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात होती. मात्र, नागौरमधील या शोधामुळे ते अवलंबित्व आता संपणार असून, भारत खनिज संसाधनांच्या क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणार आहे. राज्यातील या ऐतिहासिक शोधामुळे महसूलात मोठी वाढ होणार असून स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजस्थान आता लिथियम उत्पादनासाठी देशातील सर्वात महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



## हाफकिनला २५ कोटींचा निधी

### पोलिओ निर्मूलन मोहिमेला मिळणार गती

**मुंबई । रयत समाचार**

देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये मोलाचा वाटा उचललेल्या हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला मोठा दिलासा मिळाला आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या तब्बल २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी करण्यात आली असून, या लसींच्या निर्मितीसाठी हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकरातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.

मंत्रालयात हाफकिन संस्थेसंदर्भात आयोजित या बैठकीत संस्थेतील निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाचा प्रश्नही चर्चिला गेला. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, विधान परिषद सदस्य सचिन अहिर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर, विधी व न्याय विभागाच्या सहसचिव अश्विनी सैनी आणि वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे उपस्थित होते. हाफकिन संस्थेच्या योगदानामुळे भारत पोलिओमुक्त होण्यात यशस्वी झाला असून, आता या निधीच्या मदतीने संस्थेच्या उत्पादन क्षमतेत वाढ होणार आहे. यामुळे आगामी काळात केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशभरातील लसीकरण मोहिमेला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



**उड्डाणपूल प्रशासनाकडून राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवरायांच्या चित्रांची विटंबना होत आहे?**

**ठिकाण :** खांब क्रमांक - ४२, रिलायन्स ट्रेन्डसमोर, स्टेशन रोड, अहिल्यानगर

## पूरस्थितीला राजकीय व्यापाऱ्यांची अतिक्रमणे कारणीभूत- आ. जगताप

### नदीपात्रातील अतिक्रमणांवर कारवाईसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहमदनगर । रयत समाचार**

नुकत्याच झालेल्या पावसामुळे सीना नदीपात्रातील अतिक्रमणांचा गंभीर धोका पुन्हा एकदा उघड झाला आहे. शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले असून नागरिक भयभीत झाले आहेत. नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण करणाऱ्या काही राजकीय व्यापाऱ्यांच्या अतिक्रमणांमुळे ही स्थिती निर्माण झाल्याचा आ. संग्राम जगताप यांनी ठपका ठेवत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन दिले. निवेदनात सांगण्यात आले, हा विषय यापूर्वीही विधिमंडळ अधिवेशनात मांडण्यात आला होता. त्यानंतर नदीची हद्द निश्चितीची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, काहींनी न्यायालयाची दिशाभूल करून स्थगिती मिळवली. आजच्या पूरस्थितीत या अतिक्रमणांचे खरे स्वरूप उघड झाले असून, यावर सर्वोच्च न्यायालयात तातडीने सत्य परिस्थिती मांडावी व अतिक्रमणे तात्काळ हटवावीत, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. जर या दुर्घटनेत जीवितहानी झाली असती तर जबाबदार कोण राहिले असते? मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी संपूर्ण शहराचा जीव धोक्यात घालता येणार नाही. प्रशासनाने कुठलाही दबाव न बाळगता कठोर कारवाई केली पाहिजे, असा इशाराही निवेदनात देण्यात आला. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया राजकीय दडपणाला बळी न पडता आता काय निर्णय घेते याकडे हिंदुत्ववादी शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.



## माध्यमांनी सकारात्मक बातम्यांवर भर द्यावा

**अबू रोड । श्रीकांत काकतीकर**

आजच्या धकाधकीच्या जीवनात पत्रकारांवर ताणतणावाचे सावट वाढले आहे. डिजिटल माध्यमे आणि स्पर्धेच्या युगात वृत्तपत्रसृष्टीत सतत नवनवीन बदल होत असताना समाजात शांतता आणि सद्भावना निर्माण करण्यासाठी माध्यमांनी सकारात्मक बातम्यांना प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट आवाहन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मीडिया विंगचे प्रमुख ब्रह्माकुमार करुणाभाई यांनी केले. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालयाच्या वतीने शांतीवन येथे राष्ट्रीय पत्रकार संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनाच्या निमित्ताने बेळगाव जिल्ह्यातील पत्रकारांनी करुणाभाई यांची भेट घेतली. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, पत्रकारांना धकाधकीचे जीवन जगावे लागत असून मानसिक शांतीची नितांत गरज आहे. सकारात्मक बातम्यांचा प्रसार केल्याने समाजातच नव्हे तर पत्रकारांच्या वैयक्तिक जीवनातही शांतता निर्माण होऊ शकते. दरम्यान, बेळगाव प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालय आणि शहापूर येथील बॅरिस्टर नाथ पै गणेशोत्सव मंडळाच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या गणेशोत्सवात रक्तदान शिबिर व नशामुक्ती अभियान राबविण्यात आले होते. या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित उपक्रमांतर्गत केलेल्या सहकार्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी ब्रह्माकुमार करुणाभाई यांचा शाल व स्मृतीचिन्ह देऊन श्रीकांत काकतीकर यांच्या हस्ते गौरव केला. यावेळी बेळगाव प्रजापिता ब्रह्माकुमारी विद्यालयाचे ब्रह्माकुमार शिवानंद भाई, ब्रह्माकुमार शांतिलाल भाई तसेच हुबळी-धारवाड येथील पत्रकार उपस्थित होते.

### ‘माझे घर’साठी जमिनीचे दर निश्चित

## कॅबिनेट बैठकीत निर्णय : ४ ऑक्टोबरपासून अर्ज उपलब्ध

**पणजी । रयत समाचार**

‘माझे घर’ योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध जमिनी नियमित करण्यासाठीचे दर राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निश्चित करण्यात आले. यानुसार १९७२ पूर्वीची ते २०१४ पर्यंतची घरे नियमित करताना संबंधित घरमालकांना ठराविक दराने शुल्क आकारले जाणार आहे. या संदर्भात लवकरच अधिसूचना जारी करण्यात येणार असून, यासाठीचे अर्ज ता. ४ ऑक्टोबरपासून उपलब्ध होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिली. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी महसूल मंत्री बाबुश मोन्सेरात आणि सचिव संदीप जॅकिस उपस्थित होते. मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, सरकारी जमिनीवरील १९७२ पूर्वीच्या घरांना सनद घेण्यासाठी प्रती चौरस



मीटर २५ रुपये शुल्क आकारले जाणार आहे. १९७३ ते १९८६ दरम्यानच्या घरांना प्रती चौरस मीटर सर्कल रेट म्हणजे किमान जमीन दराच्या ५० टक्के रक्कम, १९८७ ते २००० मधील घरांना सर्कल रेटच्या ७५ टक्के, तर २००१ ते २०१४ दरम्यानच्या घरांना किमान सर्कल रेटप्रमाणे रक्कम भरावी लागणार आहे. यासाठी सरकारने २०१४ मध्ये अधिसूचित केलेले सर्कल रेट गृहीत धरले जाणार असून कोणत्याही प्रकरणात सर्कल रेट ५० रुपयांपेक्षा कमी असणार नाही. बैठकीत ठरवलेले दर असे की, कोमुनिदाद जमिनीवरील घरे कोमुनिदादच्या परवानगीने नियमित केली जातील. यासाठीचे शुल्क व दंडाची रक्कम कोमुनिदादकडे जमा केली जाईल. १९७२ पूर्वीची घरे नियमित करण्यासाठी प्रती चौरस मीटर २५ रुपये आणि एकूण शुल्काच्या २० टक्के दंड आकारला जाईल. १९७३ ते १९८६ दरम्यानच्या घरांसाठी प्रती चौरस मीटर सर्कल रेटच्या ५० टक्के शुल्क आणि २० टक्के दंड आकारला जाईल. १९८७ ते २००० मधील घरांसाठी सर्कल रेटच्या ७५ टक्के शुल्क आणि २० टक्के दंड आकारला जाईल. २००१ ते २०१४ दरम्यानच्या घरांसाठी किमान सर्कल रेटप्रमाणे शुल्क आणि २० टक्के दंड आकारला जाईल. मंत्रिमंडळ बैठकीत इतरही काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. दिव्यांग सक्षमीकरण खात्यात २८ नवीन जागांना मान्यता देण्यात आली. गोमेकॉ न्युरोलॉजी विभागात सहायक प्राध्यापकांच्या दोन जागा कंत्राटी पद्धतीने भरण्यास मान्यता देण्यात आली. सडा, बायणा आणि चिंबल येथील सुमारे ४०० पुनर्वसितांना त्यांना देण्यात आलेल्या फ्लॅटचा मालकी हक्क प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, ४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते ‘माझे घर’ योजनेचा शुभारंभ होणार आहे. यासाठी प्रत्येक पंचायतीमधून कदंब बसची सोय करण्यात आली आहे. याच कार्यक्रमात शहा यांच्या हस्ते १८ प्रकल्पांची व्हर्च्युअल पद्धतीने पायाभरणी केली जाणार असून, गोवा मनुष्यबळ विकास महामंडळ आणि मेढवी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात येणार असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

## स्वयंसिद्धेकडून स्वयंपूर्णतेकडे

### शारदोत्सवातील आठवी माळ प्रेरणादायी

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**



स्त्रियांना आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरलेली अहिल्या महिला मंडळ संस्था ही पेणसारख्या निमशहरी ठिकाणी असून, गेली अनेक वर्षे महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. आदिवासी मुलींना, गृहिणींना विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळवून देणे हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे. आज या मुली डॉक्टर, वकील बनून उच्चशिक्षणापर्यंत पोहोचल्या आहेत. स्वयंसिद्धा, स्वादभारती, संजीवनी वृद्धाश्रम, स्वानंद संस्कार वर्ग असे विविध उपक्रम अहिल्या महिला मंडळात उत्साहाने सुरू असून महिलांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्याही सक्षम करण्यासाठी हे उपक्रम खऱ्या अर्थाने महिलांच्या सक्षमीकरणाचा आधारस्तंभ ठरत आहेत. याप्रसंगी विद्यार्थिनींशी संवाद साधताना अहिल्या महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा अश्विनी गाडगीळ यांनी ‘‘नागरिकांनी आता स्वयंनिर्मितीपासून स्वयंपूर्णतेकडे धाव घेतली पाहिजे’’ असे प्रांजळ मत व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालक श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवविचार बहुआयामी स्त्री व्याख्यानमालेतील आठवे पुष्प ‘‘स्वयंसिद्धा’’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्ष कला शाखेतील कोमल धोत्रे हिने केले, परिचय पूजा पवार हिने करून दिला तर आभार प्रदर्शन मानसी कदम हिने केले. या कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. संपूर्ण कार्यक्रम आभासी पद्धतीने पार पडला, ज्यामुळे दूरदूरच्या विद्यार्थिनी व उपस्थितांना सहभागाची संधी मिळाली.

## वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण संपन्न



**अकोले । रयत समाचार**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण अत्यंत उत्साहात पार पडले. या प्रशिक्षणामध्ये तब्बल १८०० शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला. या प्रशिक्षणाचे मार्गदर्शन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर व जिल्हा प्रशिक्षण समन्वयक तसेच वरिष्ठ अधिव्याख्याता अरुण भांगरे यांनी केले. तालुकानिहाय केंद्र समन्वयकांच्या प्रभावी समन्वयातून सर्वत्र प्रशिक्षणाची मांडणी, नियोजन व आयोजन उत्कृष्टरीत्या पार पडले. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करून कार्यक्रमाला औपचारिक पूर्णविराम मिळाला. संपूर्ण प्रशिक्षण यशस्वीरीत्या राबविल्याबद्दल शिक्षकभारती संघटनेच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेरचे विशेष आभार मानण्यात आले. प्रशिक्षण उपक्रमादरम्यान शिक्षकांच्या हिताचा विचार करून संघटनेने सक्रिय सहकार्य दिल्याने शिक्षकवर्गात समाधान व सकारात्मकता निर्माण झाली. या प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे ज्ञान, अध्यापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांशी असलेले नाते अधिक दृढ होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी शिक्षकभारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, सहसचिव राहुल कानवडे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे आभार मानले.

## बारावी अर्ज भरण्याच्या तारखेला मुदतवाढ

### विद्यार्थ्यांना दिलासा

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील विद्यार्थ्यांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय झाला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या बारावी म्हणजेच फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेच्या अर्ज भरण्याच्या तारखेस मुदतवाढ देण्यात आली आहे. नियमित शुल्कासह ऑनलाईन परिक्षा अर्ज आता २० ऑक्टोबर २०२५ पर्यंत भरता येणार आहेत. अतिवृष्टीमुळे विद्यार्थ्यांना वेळेत अर्ज भरण्यात अडचणी येऊ शकतात, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी राज्य मंडळाला मार्गदर्शन केले होते. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. नियमित विद्यार्थ्यांनी UDISE + मधील PEN-ID वरून कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत ऑनलाईन अर्ज भरायचे आहेत. व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, खासगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७), श्रेणीसुधार योजनेतील विद्यार्थी तसेच आयटीआयमार्फत घेणारे विद्यार्थी यांचे अर्ज प्रचलित पद्धतीने स्वीकारले जातील. अर्ज भरण्यासाठी मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in. फेब्रु-मार्च २०२६ च्या दहावी-बारावी परीक्षेसाठी खासगी विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) सादर करण्याची मुदत १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत असणार आहे तर नवीन परीक्षा केंद्र मान्यतेसाठी प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत : १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत राहिल. या निर्णयामुळे ग्रामीण व पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# रक्तदान ही समाजसेवेची अनमोल देणगी- सूर्यवंशी

## स्व. सचिन गाडे यांच्या स्मरणार्थ गजराजनगरमध्ये युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

**अहमदनगर । विजय मते**

रक्तदान हे जीवनदान असून समाजाला समर्पित असलेली ही सेवा आहे. रक्त हे शरीरातच तयार होणारे असल्याने त्याचे यंत्राद्वारे उत्पादन शक्य नाही. मात्र, रक्तदान केल्याने ते अधिक प्रमाणात निर्माण होते. त्यामुळे गरजू रुग्णांचे प्राण वाचतातच, शिवाय रक्तदात्याला पुण्यही मिळते. समाजासमोरील ही सर्वोत्तम सेवा आहे,''असे प्रतिपादन सूर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बबलू सूर्यवंशी यांनी केले. गजराजनगर येथील युवक स्व. सचिन गाडे यांच्या अकाली निधनाने तरुणांमध्ये निर्माण झालेल्या पोकळीच्या स्मरणार्थ प्रतिष्ठानतर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी स्व. गाडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी सुनील त्र्यंबके, बाळासाहेब




पवार, विनीत पाउलबुधे, स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, ग्रामपंचायत सदस्य विशाल सूर्यवंशी, राजू गाडे, सागर मेट्टू, पै. प्रताप गायकवाड, लखन चखाले, सतीश कर्डिले आदी मान्यवर, कार्यकर्ते उपस्थित होते. नगरसेवकांनी आपल्या मनोगतांत सचिन गाडे यांच्या आठवणी सदैव प्रेरणादायी आहेत. मित्राच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर घेऊन समाजासमोर आदर्श ठेवला आहे, असे नमूद केले. साई सेवा ब्लड सेंटरच्या माध्यमातून आयोजित शिबिरात दिवसभरात तब्बल ४२ बॅग रक्तसंचय करण्यात आल्याचे डॉ. अजित जगताप यांनी सांगितले. त्याचप्रमाणे बालघर प्रकल्पातील अनाथ मुलांना भोजनदानाचा उपक्रमही राबविण्यात आला. या कार्याचे कौतुक करताना प्रकल्प संचालक युवराज गुंड यांनी स्व. सचिन गाडे यांच्या निधनामुळे झालेल्या दुःखाची भावना व्यक्त केली. रयत समाचार



# दोन रुपयांवर सुरू झालेली संस्था वटवृक्षासारखी वाढली- ॲड. दुसुंगे

## राजीव गांधी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**अहमदनगर । समीर मन्यार**

कुटुंब असो किंवा संस्था असो, कारभार एकहाती असेल तर ती प्रगतीपथावर जाते. संस्थेची वाटचाल कशी करता येईल हा प्रामाणिक उद्देश सर्व कर्मचाऱ्यांचा असावा. संस्था चालक व कर्मचारी यांचा योग्य समन्वय आवश्यक आहे. आपण ज्या संस्थेत कार्य करतो त्या संस्थेविषयी प्रत्येक कर्मचाऱ्याला आत्मीयता असावी. हे आपले कुटुंब आहे

या भावनेने काम केले पाहिजे, असे प्रतिपादन कै. राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ॲड. उद्धवराव दुसुंगे यांनी केले. संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न झाली. यावेळी ॲड. दुसुंगे बोलत होते. कार्यक्रमास व्हा. चेअरमन बाबासाहेब बांगर, मानद सचिव बाबुराव जाधव, संचालक प्रभाकर निमसे, बाबासाहेब शिंदे, प्रशांत दुसुंगे, आशालता बऱ्हाटे, सरव्यवस्थापक शंकर भोगाडे आदींसह सभासद वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पुढे बोलताना ॲड. दुसुंगे म्हणाले की, दोन रुपयांवर सुरू झालेली ही संस्था आज वटवृक्षासारखी वाढली आहे. संस्थेकडे सध्या ३०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. याचे श्रेय संचालक मंडळ व सर्व सभासदांना जाते. ''भारत देश ही एकच जात आहे.

आपण सर्व भारतीय आहोत याचा आम्हाला अभिमान आहे. या संस्थेत जातीभेदाला स्थान नाही. सर्वांना सोबत घेऊन काम केल्यानेच संस्थेला नावलौकिक प्राप्त झाला आहे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले. संस्था वाढीसाठी सर्व कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक संगणक प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. कार्यक्रमात सहकार केंद्र अहमदनगरचे प्राचार्य सुनील साखरे यांनी सभासदांना मार्गदर्शन केले. वार्षिक अहवालाचे वाचन सरव्यवस्थापक शंकर भोगाडे यांनी केले. सूत्रसंचालन शाखाधिकारी संजय वामन यांनी केले, तर आभार प्रवीण कोठुळे यांनी मानले.

रयत समाचार

# साहित्यिक रत्न ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मराठी भाषा समिती आणि जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, संवर्धन आणि जनजागृती व्हावी या उद्देशाने विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार, ता. ३ ऑक्टोबर रोजी हा अभिजात मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जाणार असून, ता. ३ ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत साहित्यिक रत्न ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, त्रिवेणी, पंपिंग स्टेशन रोड, महालक्ष्मी उद्यानाजवळ, भुतकरवाडी, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील साहित्यिकांचे ग्रंथ, वृत्तपत्रांतील लेख तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेले ग्रंथ नागरिकांना पाहता, हाताळता आणि वाचता येणार आहेत. प्रदर्शन ३ ते १० ऑक्टोबर या कालावधीत, शासकीय सुट्या वगळता, रोज सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. नागरिकांनी या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी ग्रंथालय संचालक यांनी केले.

# आजी-आजोबांच्या सहवासातच घडते चांगली पिढी- ह.भ.प. निळूभाऊ देशमुख

**अहमदनगर । रयत समाचार**

सनातन धर्म सभेतर्फे आयोजित 'शारदीय व्याख्यानमाले'तील आठवे पुष्प कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी गुंफले. ''मला भेटलेली माणसे'' या विषयावर त्यांनी प्रभावी व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना ह.भ.प. निळूभाऊ देशमुख म्हणाले की, सध्याच्या कलियुगात कुटुंब मोबाईलमध्ये गुरफटून गेले आहे.

ज्या घरात आजी-आजोबा आहेत, तिथेच संस्कार रुजतात आणि चांगली पिढी घडते. वृद्धाश्रमाऐवजी घरात आजी-आजोबांचा सहवास हा संस्कारांचा खरा वारसा आहे. व्याख्यानमालेमुळे काही क्षण तरी लोक मोबाईलपासून अलिप्त झाले, ही अभिमानास्पद गोष्ट आहे. व्याख्यानात बाळासाहेब देशमुख यांनी शारदीय नवरात्राच्या निमित्ताने आपल्या जीवनातील तीन महिलांच्या जीवनप्रणालीचा वेध घेतला. अबोली ही पाच वर्षांची जिज्ञासू व चाणाक्ष बालिका, वसुधा आधुनिक असूनही पारंपरिक गुरूमंत्र जपणारी गृहिणी, तर शेवंतासारखी ग्रामीण स्त्री जी दुष्काळ, परतीचा पाऊस, शेतजमिनीची




हानी, पोटापाण्यासाठी शहर गाठण्याची वेळ यांसारखी संकटे हसत खेळत झेलते, आयुष्य न डगमगता जगते.या तिन्ही महिलांचे जीवनचरित्र रंजक पद्धतीने उलगडून दाखवतानाच त्यांनी ग्रामीण समाजजीवनातील संघर्षाचे वास्तव प्रेक्षकांसमोर ठेवले. कार्यक्रमात आलेले श्रोते व्याख्यान ऐकून मंत्रमुग्ध झाले. यावेळी कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा सन्मान ह.भ.प. निळूभाऊ देशमुख व उमेश वाळुंजकर यांच्या हस्ते करण्यात आला. माननीय दिनकर देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी समीर उपाध्ये व दिनकर देशमुख यांनी परिश्रम घेतले. प्रसंगी शेखर रामदासी, सुधीर वैद्य, अरुण धोडपकर, हेमंत देशमुख यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# नागरी समस्यांनी केडगावकर त्रस्त

## १० वर्षांपासून मनपा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

मागील १० वर्षांपासून केडगाव देवी रोड परिसरातील अथर्व नगर, ठुबे मळा येथील नागरिकांना रस्ता, पाणी व ड्रेनेज या मूलभूत नागरी सुविधांचा तुटवडा भासत आहे. अनेक निवेदने दिल्यानंतरही समस्या कायम असल्याने संतप्त नागरिकांनी मंगळवार ता. ३० सप्टेंबर रोजी महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना भेटून तातडीने उपाययोजना करण्याचे निवेदन दिले. महापालिकेचे कर नियमित भरूनही नागरिकांना सुविधा नाकारल्या जात असल्याने संतप्त नागरिकांनी आठ दिवसांत कारवाई न झाल्यास आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तसेच



प्रश्न न सुटल्यास सर्व नागरिक महापालिका निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचेही स्पष्ट केले. यावेळी दिलीप दुधवणे, अविका पुंडे, मकरंद जोशी, विठ्ठल गारुडकर, शेषराव तांबडे, सोनवणे, मेजर सुरेश आंधळे, सतीश सूर्यवंशी, नितीन घोडके, तेजस बिचकर, भुजबळ मामा, समीर कुलकर्णी, दत्ता कुलकर्णी, ओंकार तागडे, ऋग्वेद दंडवते, दिलीप भोसले, संदीप मराठे, ताराचंद केवट, बाजीराम गर्जे, अनिकेत साळी, विजय बडवे तसेच मंजुषा पाठक, मनिषा तांबोळी, सोनाली कुलकर्णी, अबोली जोशी, वैशाली पुंडे, घोडके, दूधवणे, उषा तांबडे, गर्जे, पद्मा तांबे, प्रिती दंडवते, प्रमिला कानफाडे, कविता बिचकर, भागडे, रेखा पावसे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अथर्व नगर वसाहतीची स्थापना २००९-२०१० साली झाली असून सध्या येथे दीडशे ते दोनशे कुटुंब राहतात. परंतु वसाहतीत ना व्यवस्थित रस्ता, ना ड्रेनेज लाईन आणि ना योग्य पाणीपुरवठा असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. ड्रेनेज लाईन नसल्यामुळे घरांचे सांडपाणी व पावसाचे पाणी साचून डबके तयार होत आहेत. या ठिकाणी डास, दुर्गंधी व अस्वच्छता वाढून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पर्यायी निचऱ्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने परिसरात दूषित वातावरण निर्माण झाले आहे. सध्या पाणीपुरवठ्यासाठी दोन ते अडीच इंची जुनी लाईन वापरली जात आहे, ज्यामुळे नागरिकांना पाणी कमी दाबाने मिळते. वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता पाणीपुरवठा अपुरा पडतोय. नागरिकांनी ४ इंची नवी लाईन तातडीने टाकून देण्याची मागणी केली आहे. या भागातील रस्ता दोन वेळा मंजूर झाला असून स्थानिक दोन व्यक्तींच्या वादामुळे रस्त्याचे काम रखडले आहे. यामुळे नागरिकांना दररोज चिखल, खड्ड्यांनी भरलेल्या व धुळीच्या रस्त्यावरून प्रवास करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

# संत निरंकारी समागमचा ७८वा वार्षिक सेवा आरंभ

**अहमदनगर । रयत समाचार**

सेवाभाव, समर्पण आणि मानवतेच्या दिव्य उत्सवाचे स्वरूप होऊ घातलेल्या ७८ व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या ग्राउंड सेवांचा शुभारंभ नुकताच सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन शुभहस्ते निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे करण्यात आला.

या प्रसंगी मिशनची कार्यकारिणी समिती, केंद्रीय सेवादल अधिकारी तसेच हजारो भाविक, भक्तगण व सेवादल सदस्य उपस्थित होते. हा संत समागम ता. ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजित होणार आहे.




या भव्य आयोजनाच्या पूर्वतयारीच्या सेवांमध्ये सहभागी होण्यासाठी देशभरातून तसेच महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने सेवादल स्वयंसेवक व इतर सेवादार भक्त समालखा येथे स्वेच्छा सेवा अर्पण करतील.
या विविधतेने नटलेल्या जगात एका बाजूला भाषा, संस्कृती, जातपात आणि धर्माच्या नावाखाली मानव विभाजित होताना दिसतो; तर दुसऱ्या बाजूला एक शाश्वत सत्य मानवमात्राला एका अतूट सूत्रामध्ये गुंफते आहे. आपण सर्वजण एका ईश्वराची लेकरं आहोत, जो ईश्वर वेळोवेळी अनेक रूपांत साकार होऊन प्रेम, करुणा, समानता आणि मानवतेचा दिव्य संदेश देत आला आहे. जरी आपली रूपं व राहणीमान वेगवेगळी असली तरी आपल्यामध्ये तीच जीवनशक्ती प्रवाहित होत आहे, जी एकमेकांशी जोडण्याचे कार्य करते. हीच भावना आत्मसात करून संत निरंकारी मिशन मागील ९६ वर्षांपासून 'वसुधैव कुटुंबकम्' अर्थात 'अवघे विश्व एक परिवार' ही दिव्य संकल्पना जिवंत ठेवत आहे आणि विशाल संत समागमांच्या माध्यमातून तिची कृतीत अंमलबजावणी करत आहे. जवळपास ६०० एकर परिसरात पसरलेले समालखा येथील हे समागम स्थळ सेवा, श्रद्धा आणि मानवतेचे प्रतीक मानले जाते. येथे फक्त निरंकारी मिशनच्या अनुयायांनाच नव्हे, तर प्रत्येक धर्म, जात आणि भाषेच्या देश-विदेशातील मानवप्रेमींचे स्वागत खुले दिलाने केले जाते. येथे मानवता, आध्यात्मिकता आणि सेवाभाव यांचा अनुपम संगम अनुभवायला मिळतो आणि अशी एक अलौकिक अनुभूती लाभते जी शब्दांच्या पलीकडील आहे.


**ॲड. टी.वाय. ठाकूर**
अ.नगर
नि.नं. ७

**घोषणापत्र/सायटेशननोटीस**

**अहमदनगर येथील मे. १९वे सह दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अ.नगर यांचे कोर्टात**

**सिव्हील एम. ए. क्र. २९९/२०२५**
**ने ता : ०७/११/२०२५**

**अर्जदार :** खान नजीरखान कारीममिया रा. ४४२६, सबजेल चौक, मिरची कांडप जवळ, ता. जि. अहमदनगर. ४१४००१

**सामनेवाले :** कोणी नाही

ज्या अर्थी अर्जदार यांची पत्नी सुलताना नजीर खान ही दिनांक २०/०४/२०२५ रोजी मयत झाली आहे. मयत सुलताना नजीर खान यांच्या मृत्यूनंतर सदरील अर्जदार हेच त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. सबब मयत सुलताना नजीर खान यांचे अर्जदार हेच वारस आहेत असे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज आणलेला आहे. त्याअर्थी अर्जदार हे मयत सुलताना नजीर खान यांचे कायदेशीर वारस नव्हेत, अगर अर्जदार त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र देऊ नये असे कोणाचेही म्हणणे असल्यास त्यांनी सदरचे घोषणापत्र/सायटेशन नोटीस प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यानिशी मा. न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास मा. न्यायालय लागलीच अर्जदाराचा पुरावा घेऊन अर्जदारांचे लाभत पुढील योग्य तो आदेश करतील याची नोंद घ्यावी. आज ता २९/०९/२०२५ रोजी मा सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले असे.

**बेंच क्लार्क**
मे. १९वे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर कोर्ट, नगर

**हुकुमावरून**
सह अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अ.नगर

प्रती,

**१) मा. जिल्हा न्यायालय, अ.नगर, २) मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अ.नगर, ३) मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, अ.नगर, ४) मा. जिल्हाअधिकारी कार्यालय, अ.नगर, ५) मा. तहसील कार्यालय नगर, ६) सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया, शाखा लक्ष्मीबाई कारंजा अहमदनगर.**


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक :** दिपक शिरसाठ, 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय :** श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,**१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# संघटीत राहीलो तरच आपले प्रश्न सुटणार- डोळसे

## रेशन दुकानदारांचा जिल्हास्तरीय मेळावा

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

संघटनेच्या रेट्यामुळे प्रयत्नामुळे दुकानदारांच्या मार्जीन मध्ये वाढ झाली, आणखी ही वाढीसाठी संघटना प्रयत्नशिल आहे. संघटनेच्या रेट्यामुळे यापुढे सर्व्हअर विभागणी झाल्यामुळे आता सर्व्हअर व्यवस्थीत चालणार आहे. येत्या काही दिवसात राज्य सरकारला सोबत घेवून अनेक कायद्यादुरूस्तीसाठी प्रयत्नशील आहे. राज्यात हमालीमुक्त टेंडर असल्याने कुणीही हमाली देण्याचे कारण नाही, आपण संघटीत राहीलो तर आपले प्रश्न सुटणार आहेत असे प्रतिपादन ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉप किपर्स फेडरेशनचे प्रदेशाध्यक्ष गणपतराव डोळसे यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर तालुक्यातील प्रसिद्ध व जागृत देवस्थान असलेले हरीहर केशवगोविंद बन येथे ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉप किपर्स फेडरेशनच्या नुकत्याच संपन्न झालेल्या आहिल्यानगर जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात उपस्थीतांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्रीरामपूरचे तालुकाध्यक्ष बजरंग दरंदले हे होते तर या मेळाव्यास फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी बाबुराव म्हमाणे, नाशिकचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती महाराज कापसे, पुणे विभागीय अध्यक्ष शहाजी लोखंडे, उत्तरेचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ आरगडे, मार्गदर्शक देविदास देसाई, नेवासा तालुकाध्यक्ष सुरेशराव उभेदळ, चंद्रकांत झुरंगे, विश्वासराव मोहिते, बाबा कराड, रासपचे आत्माराम कुंडकर, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समीतीचे संचालक दशरथ पिसे, सुर्योदय पतसंस्थेचे संस्थापक दिलीपराव गायके, ज्ञानदेव वहाडणे, विष्णुपंत डावरे आदि व्यासपिठावर उपस्थीत होते. ज्या जिल्ह्यांचे कोविड काळातील तसेच इतर देयके सरकारकडून येणं असेल त्यांनी आपल्या जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाकडून पेंडींग देयकांची माहीती उपलब्ध करून द्यावी ती देयके सरकारकडून मिळवून देवू. यापुर्वी एकाच सर्व्हअर मार्फत ई पॉझ मशीन चालत होते, आता पाच ते सहा जिल्हे मिळून एक या प्रमाणेसर्व्हअरची विभागणी करत सर्व्हअर संख्या वाढवून विभागणी केल्याने आता ई पॉझ मशीन व्यवस्थीत चालणार आहे.

लवकरच रेशन संबधातल्या ४० कायद्यात दुरूस्तीचा प्रस्ताव असून ते लवकरच दुरूस्ती होतील.त्याच प्रमाणे गुजरात बरोबर लवकरच महाराष्ट्रात ही धान्याच्या लाभार्थ्यांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्यात येणार आहे. लवकरच रेशन दुकानातील ई पॉझ मशीनवर रेशनकार्ड मधील नाव वाढ करणे, नाव कमी करणे आदि कामे रेशन दुकानातच करता येणार आहे. सर्वांनी एक दिलाने काम करा. भेदभाव करू नका, संघटना मोठी झाली तरच आपण मोठे होणार असतो. संघटनेत कुणीही मोठा नसतो. सर्वांनी



एकमेकांना समजून घ्या. आम्ही तुमचे प्रश्न सोडविण्यासाठी बांधील आहोत पण सर्वांनी एक मताने, एक दिलाने काम करा. दुकानदारांनी लाभार्थींशी प्रेमाणे वागा, त्यांना आदराची वागणुक द्या असे आवाहन यावेळी गणपतराव डोळसे यांनी केले. यावेळी नाशिकचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती महाराज कापसे, शेवगाव येथील आत्माराम कुंडकर, राहाता येथील ज्ञानेश्वर वहाडणे, नगर येथील विश्वासराव जाधव, संगमनेर येथील दादा बोंबले, श्रीरामपूरचे तालुकाध्यक्ष बजरंग दरंदले, चंद्रकांत झुरंगे, नेवासाचे सुरेशराव उभेदळ आर्दिंनी मनोगतं व्यक्त करत विविध दुकानदारांच्या विविध समस्या मांडल्या. माजी जिल्हाध्यक्ष देविदास देसाई यांनी प्रास्ताविकात जिल्हा संघटनेचा आढावा मांडत दुकानदारांच्या अडचणी मांडल्या. सुत्रसंचालन रज्जाक पठाण यांनी केले तर आभार भाऊसाहेब वाघमारे यांनी मानले. यावेळी ऑल महाराष्ट्र फेअरप्राईज शॉपकिपर फेडरेनच्या अहिल्यानगर जिल्हाकार्याध्यक्षपदी श्रीरामपूरचे रज्जाक पठाण यांची तर जिल्हा सचीव पदी नेवासा तालुक्यातील भरत भाकड यांची नियुक्ती करण्यात आली तसेच नवनिर्वाचीत अहिल्यानगर उत्तरचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ आरगडे यांचेसह नवनिर्वाचीत पदाधिकार्यांचा सन्माण मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार लालमहमद जहागीरदार, प्रकाश गदीया, सुखदेव खताळ, राजेंद्र वाघ, भगवानराव तेलोरे, गणेशराव एलम, प्रकाश गदीया, कांताराम पवार, सयराम साबळे, अजीज शेख, योगेश नागले, सुधिर गवारे, किरण मुठे, भाऊसाहेब वाघमारे, शिवाजी नवले, राजेंद्र शिंदे, बाळासाहेब कांगुणे, एस.एल घोगरे, अनिल मानधना, दादासाहेब मैराळ, विकी काळे, राजन वधवाणी, नानासाहेब वाक्चौरे, लालाभाई शेख, शिवाजी गिठे, सोमनाथ लोंढे, शामराव गुंजाळ, बाळासाहेब राठोड, दिगंबर शिंदे, ज्ञानदेव शेळके व समाधान मुंगसे आर्दिंसह मोठ्या संख्येने जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार, विविध कार्यकारी संस्थांचे प्रतिनिधी व महिला बचत गटांचे प्रतिनिधी उपस्थीत होते. रयत समाचार

# ४ ऑक्टोबरला महाआरोग्य तपासणी शिबिर

## जय मातादी मित्र मंडळाचा उपक्रम

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

सामान्य नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळून जनतेचे आरोग्य सुधारावे, या उद्देशाने जय मातादी मित्र मंडळ, जय मातादी फाउंडेशन व एकता महिला मंच, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत महाआरोग्य तपासणी व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिर शनिवारी ता. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत जय मातादी सांस्कृतिक भवन, आदर्श नगर, दत्त मंदिरासमोर, दशमेश नगर, श्रीरामपूर येथे होणार आहे. शिबिरात एसएमबिटी हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित राहणार असून शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, श्रीरामपूर येथील विद्यार्थ्यांचे सहकार्यही लाभणार आहे. शिबिरात हृदयरोग (मोफत ईसीजी तपासणीसह), मधुमेह, रक्तदाब, श्वसनविकार, दमा-ॲलर्जी, हाडांचे व संधिवाताचे विकार, स्त्रीरोग व अस्थिरोग, मेंदूविकार, सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच शस्त्रक्रिया संबंधित आजारांची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेष म्हणजे, आवश्यकतेनुसार रुग्णांना पुढील उपचारासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन दिले जाईल. हा उपक्रम महा. फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत नोंदणीकृत रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत असून सर्व नागरिकांसाठी खुला आहे. नोंदणीची सुविधा शिबिराच्या दिवशीच जय मातादी सांस्कृतिक भवन येथे उपलब्ध राहील. नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रयत समाचार

# दान रकमेचा तपशील जनहितासाठी प्रसिद्ध करावा

## बल्लाळ यांची मागणी

**नेवासा । विजय खंडागळे**

जागतिक देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील दानपेटीत नियमानुसार आठ दिवसांनी उघडण्यात आलेल्या पेटीत शनिभक्तांनी तब्बल ७ लाख ३५ हजार रुपयांचे दान अर्पण केल्याची माहिती समोर आली आहे. या दानात रोख रक्कम, अलंकार, दागिने, सोने-चांदीची वस्तू तसेच देश-विदेशातील चलनाचा समावेश असल्याचे कळते. या रकमेचे मोजमाप शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत इन कॅमेरा करण्यात आले. देवस्थानचे तात्कालीन कार्यकारी अधिकारी उदयकुमार बल्लाळ यांनी यापूर्वी मोजमाप झालेल्या रक्कमेचा व दागिन्यांचा तपशील फक्त कागदोपत्री उपलब्ध होत असल्याचे सांगून यापुढे हा संपूर्ण तपशील नोटीस बोर्डावर व विविध भाषांमध्ये जनतेसमोर प्रसिद्ध करण्याची मागणी केली आहे. बल्लाळ यांनी म्हटले की, शनिभक्तांनी दिलेल्या दानातून किती पैसा जमा झाला, तो कोठे व कशासाठी वापरला गेला, याची माहिती भक्तांना मिळणे गरजेचे आहे. देवस्थान शासकीय प्रशासकीय यंत्रणेकडे गेले असल्याने पारदर्शक कारभार होण्यासाठी आणि पैशाची उधळपट्टी थांबवण्यासाठी ही माहिती नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करावी. यामुळे शनिभक्तांचा देवस्थानावरील विश्वास वाढेल, असेही ते म्हणाले.

रयत समाचार



# पाळीव प्राण्यांचे, पिकांचे झालेले नुकसान मनाला वेदना देणारे- आ. मोनिका राजळे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शनिवार, ता. २७ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे देवटाकळी, भातकुडगाव व परिसरातील शेतकरी आणि नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पिकांचे प्रचंड नुकसान, पाळीव प्राण्यांचा मृत्यू, वाहतूक व दळणवळण व्यवस्था विस्कळीत होऊन पायाभूत सुविधांना मोठा फटका बसला आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी आणि झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी दौरा केला. यावेळी त्या म्हणाल्या, ''शेतकऱ्याने कष्टाने उभा केलेला पिकांचा संसार आणि मुलाप्रमाणे सांभाळलेल्या पाळीव प्राण्यांचे झालेले नुकसान मनाला वेदना देणारे आहे. शासन आपल्या पाठीशी असून दिवाळीपूर्वी आपत्तीग्रस्तांना मदत मिळावी यासाठी पंचनामे तातडीने पूर्ण करावेत,'' अशा सूचना त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांना दिल्या. पाहणी दौऱ्यात हिंगणगाव, देवटाकळी, गुंफा, भातकुडगाव, भायगाव, बक्तरपूर, शहरटाकळी, मठाचीवाडी, भावीनिमगाव व शेवगाव शहर परिसरातील नुकसानीची माहिती घेण्यात आली. या वेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब पाटेकर, तालुकाध्यक्ष महेश फलके, भीमराव सागडे, लक्ष्मणराव शिंदे, वाय. डी. कोल्हे, भिमराज सागडे, सतीश लांडे, भूषण देशमुख, संदीप खरड, गंगाभाऊ खेडकर, मुसाभाई शेख, महादेव पवार, सुभाषराव बडदे, रणजीत वने, सुभाषराव बरबडे, अनिल सुपेकर, सुरेश बडे, गुरुनाथ माळवदे, सचिन फटांगरे, रमेश कळमकर, संभाजीराव फटांगरे, सोपानराव वडणे, नितीन खंडागळे, संतोष आढाव, योगेश काळे आदी मान्यवर उपस्थित होते. शासकीय यंत्रणेतील नायब तहसीलदार संजय गायकवाड, तालुका कृषी अधिकारी अंकुश जोगदंड, विद्युत वितरणाचे उपकार्यकारी अभियंता संदीप डोळे, सार्वजनिक बांधकाम उपअभियंता प्रल्हाद पाठक, पंचायत समिती विस्ताराधिकारी दादासाहेब शेळके, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे अभियंता पवार, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर जाधव तसेच संबंधित मंडलाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व कृषी अधिकारी उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचा संसार उघड्यावर पडला असून हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. नागरिकांच्या तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना वेळेत मदत व पुनर्वसन कार्यवाही सुरू करण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. रयत समाचार

# अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल; नुकसानभरपाई द्या- संदीप वर्पे

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या ऊस, फळबागा तसेच कांदा, सोयाबीन, मका, टोमॅटो व इतर हंगामी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे नष्ट झाल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, त्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिसकावला गेला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचे आर्थिक गणित कोलमडून पडले असून कर्जबाजारीपणाचे सावट गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी



काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. संदीप वर्पे यांनी तहसीलदार महेश सावंत यांना निवेदन देत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने नुकसानभरपाईची रक्कम जमा करण्याची मागणी केली आहे. निवेदनातील प्रमुख मागण्या मध्ये कोपरगाव तालुक्यातील सर्व बाधित गावांमधील पिकांचे व शेतमालाचे तात्काळ सरसकट पंचनामे करून शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत.

बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी. ज्यांची पिके पूर्णपणे नष्ट झाली आहेत अशा शेतकऱ्यांना विशेष आर्थिक मदत मंजूर करावी. महाराष्ट्र शासनाने सरसकट कर्जमाफी जाहीर करावी. अशा आहेत. यावेळी वर्पे म्हणाले की शेतकरी हा देशाचा कणा आहे. त्याला आधार देणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. जर मागण्यांकडे तातडीने लक्ष दिले नाही तर आम्हाला आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल,'' असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी बापू रांधवणे, तानाजी जाधव, ॲड. दिलीप लासुरे, ॲड. रमेश गव्हाणे, सुरेश आसने, सुनील वर्पे, निखिल थोरात यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. रयत समाचार

# प्रहार अपंग क्रांती आंदोलन तालुकाध्यक्षपदी सुरेश गलांडे



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चु कडू यांच्या प्रेरणेने प्रभावित होऊन श्रीगोंदा तालुक्यातील देऊळगाव गलांडे येथील रहिवासी सुरेश हरिभाऊ गलांडे यांची प्रहार अपंग क्रांती आंदोलनच्या श्रीगोंदा तालुका अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. सामाजिक, दिव्यांग, सांस्कृतिक, पर्यावरणीय तसेच निराधारांना आधार देणे आणि कोरोना काळात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची निवड बिनविरोध करण्यात आली आहे. प्रहार अपंग क्रांती आंदोलनाचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, जिल्हाध्यक्षा लक्ष्मी देशमुख, सचिव हमीद भाई, मधुकर घाडगे, उत्तर जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब ढोकणे तसेच समन्वयक यांच्या उपस्थितीत संघटनेची बैठक पार पडली. या बैठकीत तत्कालीन तालुका अध्यक्ष राजेंद्र पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते सुरेश गलांडे यांची निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांच्या हस्ते निवडीचे पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी निवड स्विकारताना सुरेश गलांडे म्हणाले, ''बच्चु कडू यांच्या आदेशानुसार पदाचा सुयोग्य वापर करून अधिकाधिक दिव्यांग बांधवांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन.'' त्यांच्या निवडीबद्दल साई कलेक्शनचे भाऊसाहेब दांगडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष माधव बनसुडे, प्रहारचे गुरु गायकवाड, अमोल कांबळे, भागवत व्यवहारे व आकाश दांगडे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. श्रीगोंदा पंचक्रोशीतून त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रयत समाचार

# भोंगळ कारभाराला वैतागून चालकमालकांचे आंदोलन

## ६ ऑक्टोबरपासून श्रीरामपूर - नगर आरटीओसमोर धरणे जाहीर

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील कारभारातील भोंगळपणा, भ्रष्टाचार व गैरप्रकारांमुळे संतप्त झालेल्या वाहन चालकमालक प्रतिनिधी संघटनेने थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. ६ ऑक्टोबर २०२५ पासून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय, प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय या ठिकाणी दररोज बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. या संदर्भात वाहन चालकमालक प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी यांना लेखी निवेदन सादर केले. ''भ्रष्ट अधिकाऱ्यांचा



कारभार तात्काळ बंद व्हावा व जबाबदारांवर चौकशी व्हावी,'' अशी ठाम मागणी शिष्टमंडळाने केली. संघटनेच्या मागण्या पुढीलप्रमाणे सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर योग्य ती चौकशी व कारवाई. कार्यालयातील सर्व वाहनांची ऑफलाईन रेकॉर्डस् त्वरित १००% ऑनलाईन करणे. कागदपत्रे स्वीकारताना त्याची पोहोच द्यावी. वाहन हस्तांतरणावेळी बाहेरील आरटीओची अनावश्यक तपासणी थांबवावी. कार्यालय क्षेत्राबाहेरील अनुज्ञप्ती चाचणी सुरू करावी. प्रत्येक तालुक्यात दरमहा किमान २०० चाचण्या घेण्यात याव्यात. वाहन तपासणीनंतर तत्काळ योग्यता प्रमाणपत्र देणे बंधनकारक करावे सेवाहमी कायद्याप्रमाणे कनिष्ठवरिष्ठ लिपिकांना कामकाज सोपवावे. मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. कार्यालयात बायोमेट्रिक हजेरी मशीन बसवावे. एमबीबीएस डॉक्टर उपलब्ध नसल्याने ऑफलाईन मेडिकल फिटनेस प्रमाणपत्र अपलोड करण्याची परवानगी द्यावी. वाहन चालकमालक प्रतिनिधींना बैठक व्यवस्था व कार्यालयात सुरक्षा रक्षकाची नेमणूक करावी. या आंदोलनाच्या हाकेत उत्तर महाराष्ट्र वाहन चालकमालक संघटनेचे अध्यक्ष संदिप गाडेकर, ऑटो रिक्षा संघटना व प्रेस क्लब नेवासा संस्थापक अध्यक्ष सलीम शेख, आरपीआय (आठवले गट) वाहतूक आघाडी जिल्हाध्यक्ष विजय पाठक, भाजप ओबीसी युवा सोशल मीडिया सेलचे जावेद शेख, जरिया फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शामराजे गवारे, राष्ट्रीय श्रीराम संघ शिरसगाव आदी पदाधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग असून, ''लढा न्यायाचा, थांबणार नाही'' असा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे. ६ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या या धरणे आंदोलनामुळे श्रीरामपूरसह संपूर्ण जिल्ह्यातील परिवहन यंत्रणेला धसका बसणार हे निश्चित आहे.

रयत समाचार

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०६ वि जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद



## एसएसजीएम महाविद्यालयात 'नवदुर्गा हेल्मेट रॅली'

**कोपरगाव । किसन पवार**

एस. एस. जी. एम. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उपप्रादेशिक परिवहन विभाग, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवानिमित्त नवदुर्गा हेल्मेट रॅली चे नुकतेच आयोजन करण्यात आले. रॅलीचे उद्घाटन कोपरगाव पोलीस स्टेशनचे पीएसआय एन. बी. गलांडे, सहाय्यक परिवहन निरीक्षक निकिता पानसरे आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उपनिरीक्षक गलांडे यांनी प्रवास सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे व हेल्मेटच्या वापराचे महत्त्व अधोरेखित केले. निकिता पानसरे यांनी ''दररोज हजारो अपघात होत असताना हेल्मेट हा सुरक्षित प्रवासाचा सर्वात मोठा आधार आहे'' असे सांगितले. संदीप निमसे यांनी स्त्रीदेवता व स्त्रियांच्या बहुपदरी भूमिकेचे उदाहरण मांडले, तर अनंता जोशी यांनी स्त्रीच्या संस्कारातून समाजाला दिशा मिळते असे स्पष्ट केले. अध्यक्षस्थान भूषवताना प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी ''महिला शिकल्यास संपूर्ण समाज शिकतो'' असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. बंडेराव तऱ्हाळ यांनी केले, संयोजन प्रा. बाळू वाघमोडे, सूत्रसंचालन प्रा. डॉ. सीमा दाभाडे यांनी केले, तर आभार प्रा. महेश दिघे यांनी मानले. कार्यक्रमाला उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रयत समाचार

## अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ, पुणे अध्यक्षपदी साहेबराव खामकर

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ, पुणे या संस्थेची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच एस.एम. जोशी सभागृह, पुणे येथे पार पडली. या सभेत संस्थेच्या अध्यक्षपदी साहेबराव खामकर यांची निवड करण्यात आली. ही संस्था धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील नोंदणीकृत असून तिची स्थापना सन १९९३ मध्ये झाली. संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असून पुणे शहरात संस्थेची मालकीची सदनिका आहे, जिथे जिल्ह्यातील गरजू विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. निवडीनंतर बोलताना खामकर यांनी सांगितले की, संस्थेचे विविध उद्देश असून त्यापैकी गरजू विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त वसतिगृह उभे करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. माजी अध्यक्ष व राज्याचे अप्पर सहकार आयुक्त भास्करराव शेळके यांनी सांगितले की, संस्थेचे प्रथम अध्यक्ष पुणे येथील प्रख्यात डॉ. कल्याण गंगवाल तर उपाध्यक्ष राज्य शासनातील अधिकारी निर्मलकुमार देशमुख होते. तसेच संस्थेच्या स्थापनेत नितीन करीर, शिवाजीराव देशमुख आदी मान्यवरांचा मोठा सहभाग होता. याच कार्यक्रमात इयत्ता दहावी, बारावी, एमपीएससी, यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा तसेच उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार सोहळाही पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी पोलीस सहआयुक्त रंगनाथ उंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक अविनाश शहाणे, अखिल मराठी मोर्चा, नवी दिल्ली चे अध्यक्ष आनंद रेखी, पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. संतोष खामकर व एनएमडी प्रा.लि. चे संस्थापक अध्यक्ष नवनाथ दरेकर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी उपाध्यक्षपदी रवि चौधरी व रावसाहेब सपकाळ यांची निवड करण्यात आली. निवडीबद्दल संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक भास्करराव शेळके यांनी सर्वांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रावसाहेब पवार यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. सुनिलराजे निंबाळकर यांनी केले. रयत समाचार



# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार भरपाई द्या

## आ. हेमंत ओगले यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी



**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

बळीराजा आज कधी नव्हे एवढा अडचणीत सापडला आहे. सततच्या पावसामुळे पिके डोळ्यांसमोर सडत आहेत. त्यामुळे सरकारने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी ठाम मागणी आमदार हेमंत ओगले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. आ. ओगले यांनी श्रीरामपूरराहुरी विधानसभा मतदारसंघातील अतिवृष्टीग्रस्त भागाची वस्तुस्थिती मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, गेल्या पंधरा दिवसांपासून झालेल्या सततच्या पावसामुळे शेती, पिके व मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. कपाशी, सोयाबीन, मका, कांदा, भाजीपाला, फळबागा, जनावरांचा घास तसेच सौर कृषी पंप वाहून गेले आहेत. अनेक गावे नदी-नाल्याच्या पुराच्या पाण्यात सापडून शेती खरडून गेली आहे. घरांची पडझड झाली असून शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. राहुरी तालुक्यातील दवणगाव येथील तरुण शेतकरी प्रकाश खपके याने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीतून उभा राहता न आल्याने घेतलेल्या कर्जाच्या भीतीने आत्महत्या केली, अशीही गंभीर बाब आमदारांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर मांडली. संपूर्ण मतदारसंघात भीषण परिस्थिती निर्माण झाली असून पंचनाम्याचे काम सुरू आहे. पण हे पंचनामे सरसकट करून दिवाळीपूर्वीच शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी. तसेच संपूर्ण कर्जमाफी तातडीने अमलात आणावी, अशी ठाम मागणी आ. हेमंत ओगले यांनी मुख्यमंत्र्यांची मुंबई येथे भेट घेऊन केली. बळीराजाची बिकट परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी सर्व स्तरांतून अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रयत समाचार

# सर्वद फाऊंडेशनचे पहिले राज्यस्तरीय साहित्य संमेलन उत्साहात संपन्न



**पालघर । गुरूदत्त वाकदेकर**

साहित्य समाजमनाचा आरसा आहे. विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांना लिहायला लावले तर समाजाला दिशा मिळेल, तसेच भावी पिढीला स्फूर्ती मिळेल, अशा शब्दांत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ महादेव गो. रानडे यांनी साहित्यप्रेमींना साद घातली. ते सर्वद फाऊंडेशनतर्फे सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या या दिंडीत पुस्तकांच्या सजीव झेंड्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उद्घाटन सनदी अधिकारी हर्षवर्धन जाधव यांच्या हस्ते झाले. त्यांनी मराठी भाषेच्या प्रचारासाठी शासनाच्या विविध योजना सुरू असल्याचे सांगत, संस्था आणि साहित्यिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा. सर्वद फाऊंडेशनने नव्या पिढीतील साहित्यिक घडवावेत, असे मत व्यक्त केले. संमेलनात साहित्यिक अशोक बागवे यांनी 'गंमतीजमतीं'नी उपस्थितांना खळखळून हसवले. कवी सतिश सोळांकूरकर यांची ''शाळेतल्या दिवसांचा पाऊस'' ही कविता रसिकांच्या मनाला भावली. तर कवी अरुण म्हात्रे यांनी कवितेच्या स्फुरणामागील भावविश्व उलगडून दाखवले. सर्वद फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुचिता पाटील यांनी प्रास्ताविकात, आज मोबाईलच्या आभासी दुनियेत प्रत्यक्ष संवाद हरवत चालला आहे. हे संमेलन म्हणजे संवादाची खरी भाषा पुन्हा समजून घेण्याचा प्रयत्न आहे, असे मत व्यक्त केले. स्वागताध्यक्ष डॉ. किरण सावे यांनी ''मनाची 'सर्व्हिसिंग' झाली तर आजार दूर राहतात आणि समृद्धी वाढते,'' असे सांगत साहित्य संमेलनाचे मानसिक आरोग्याशी असलेले महत्त्व अधोरेखित केले. यावेळी डॉ. सुचिता पाटील यांच्या ''झाले जलमय'' या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन सुहास राऊत यांनी केले. दुपारच्या सत्रात रंगलेल्या कविसंमेलनात प्रा. विवेक कुडू, रुपाली राऊत व शीतल संखे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच साहित्यिक डॉ. महेश अभ्यंकर, पत्रकार अशोक शिंदे व सुशील शेजुळे यांच्या मुलाखतींनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. हा कार्यक्रम निमा लोखंडे आणि नेहा राऊत यांनी नेत्रदीपकरीत्या नेला. सायंकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमात लावणी, मंगळागौर व तारपा यांसारख्या पारंपरिक नृत्यांनी संमेलनाला विशेष बहार आणली. अभिजीत राऊत यांनी सूत्रसंचालन केले. साहित्य, संस्कृती आणि परंपरेचा मेळ घडवणारे हे संमेलन साहित्यजगतातील नव्या वाटचालीची नांदी ठरले आहे. रयत समाचार

# 'जय मल्हार'ची आर्या जगताप थाळीफेक स्पर्धेसाठी पात्र



**पारनेर । रयत समाचार**

तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत जय मल्हार विद्यालयाची १४ वर्षांखालील गटातील इयत्ता आठवीची विद्यार्थीनी आर्या जगताप हिने थाळीफेक या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत दुसरे स्थान पटकावले. तिने तब्बल १३.४० मीटर थाळी फेकून हा मान मिळवला असून, ती जिल्हास्तरीय थाळीफेक स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. या यशामध्ये क्रीडा शिक्षक गरकळ यांचे मार्गदर्शन, विद्यालयाचे मुख्याध्यापक सुंबरे, सर्व शिक्षकवर्ग, कर्मचारी, संस्था पदाधिकारी, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, हितचिंतक व मुंबईकर यांचा मोलाचा सहभाग राहिला. सर्वांनी आर्याचे मनःपूर्वक अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या.



नगर प्रकरणी जमेतुल उलेमाचे निवेदन

## सामाजिक सौहार्द बिघडवणाऱ्यांवर तातडीने कडक कारवाईची मागणी

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नगर शहरात सोमवारी दुर्गादौड प्रसंगी घडलेल्या घटनेविरोधात अहमदनगर जिल्हा जमेतुल उलेमा संघटनेतर्फे जिल्हाभरातील सर्व शाखांनी तहसीलदारांना निवेदन सादर केले. या निवेदनात समाजातील शांतता व बंधुता धोक्यात आणणाऱ्या दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

सोमवारी नगरमध्ये दुर्गादौड दरम्यान काही समाजकंटकांनी रस्त्यावर प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेब यांचे नाव लिहून त्यावर पाय ठेवण्याचा प्रयत्न केला. या कृत्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून संताप व्यक्त करण्यासाठी नगरमध्ये आंदोलन देखील झाले. धार्मिक उत्सव साजरे करताना इतर धर्मियांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. नगरमधील प्रकार हा नियोजनपूर्वक घडवून आणल्याचे दिसते. त्यामुळे दोषींवर कठोर कारवाई होणे अपरिहार्य आहे, असे मत जमेतुल उलेमाचे जिल्हाध्यक्ष मौलाना मोहम्मद इरशादुल्लाह यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील प्रत्येक तहसील स्तरावर स्थानिक जमेतुल उलेमा शाखेतर्फे तहसीलदारांना हे निवेदन देण्यात आले असून, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडेही कारवाईची मागणी पोहोचविण्यात आली आहे. रयत समाचार

